**पोलीस अधीक्षक कार्यालय, सांगली**

https://www.sanglipolice.gov.in

Email ID-sp.sangli@mahapolice.gov.in

**दिनांक २०/०३/२०२६**

# सांगली जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२४-२५

दिनांक १५/०३/२०२६ रोजी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेबाबत

## उमेदवारांसाठी सुचना व त्यांना प्राप्त गुणाची यादी

१) पोलीस अधीक्षक सांगली आस्थापनेवरील पोलीस शिपाई भरती २०२४-२५ ची लेखी परिक्षा दिनांक १५/०३/२०२६ रोजी घेण्यात आली होती. पोलीस शिपाई यांचे लेखी परिक्षेचे प्रश्न पत्रिका संच A, B, C, D या प्रमाणे तयार करण्यात आलेले असुन त्यांची उत्तरतालिका A, B, C, D या प्रमाणे दिनांक १६/०३/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. सदर प्रश्नतालिकेमधील प्रश्नपत्रिका संच व प्रश्न क्रमांक

| प्रश्न संच- A | प्रश्न संच- B | प्रश्न संच- C | प्रश्न संच-D |
|---|---|---|---|
| ६८ | १८ | ४४ | ९३ |

**प्रश्न-** एक फळ विक्रेता १० रुपयाला ५ या दराने संत्री खरेदी करतो व १५ रुपयाला ६ या दराने विक्री करतो तर त्याला किती टक्के नफा मिळतो.

**पर्याय :-** अ) ५० % ब) ४० % क) ३० % ड) २० %

**या प्रश्नाचे उत्तरातील संदिग्धतेमुळे सर्व उमेदवारांना १ गुण देण्यात येत आहे.**

२) पोलीस शिपाई पदाकरीता उमेदवारांना लेखी परीक्षेस मिळालेल्या गुणांची यादी याव्दारे सांगली जिल्हा पोलीस दलाचे https://www.sanglipolice.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

३) लेखी परिक्षेस किमान ४० टक्के (४० गुण ) मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परिक्षेमध्ये ४० टक्के (४० गुण )पेक्षा कमी गुण असलेल उमेदवार अपात्र समजण्यात येतील.

४) लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणांबाबत शंका /आक्षेप असल्यास उमेदवाराकडील OMR अधिकृत कार्बन कॉपीसह दिनांक २३/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पर्यंत समक्ष अथवा ई-मेल आयडी sp.sangli@mahapolice.gov.in या ई-मेल वर पोलीस नियंत्रण कक्ष सांगली कडील **दुरध्वनी क्रमांक ०२३३-२६७२१०० व मोबाईल क्रमांक ९७३०९२८९५८ व संपर्क साधुन हरकती /आक्षेप नोंदवावेत.** दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती/आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

५) लेखी परीक्षा दिलेल्या उमेदवार यांचेकडे एन.सी.सी चे C प्रमाणपत्र असल्यास त्यांनी त्याबाबतचे आवश्यक कागदपत्र दिनांक २३/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा.पर्यंत समक्ष अथवा ई-मेल आयडी sp.sangli@mahapolice.gov.in या ई- मेल वर सादर करावेत. तद्नंतर एन.सी.सी चे C प्रमाणपत्र असल्यास त्याचे वाढीव गुण प्रसिध्द करण्यात येतील.

६) पोलीस भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल/ निर्णय घेण्याचा अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

**( संदीप भ. घुगे )**
**पोलीस अधीक्षक, सांगली.**